The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# वारकरी संप्रदायातील संत जनाबाईच्या अभंगातील प्रासंगिकता

**प्रा. डॉ. गायकवाड मारोती गोविंदराव**
मराठी विभाग, शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ

भारतातील अनेक भक्ती संप्रदायापैकी एक प्रमुख आणि महत्त्वाचा संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय होय. हा संप्रदाय म्हणजे बाराव्या शतकात हिंदू धर्मांतर्गत बंड करून (जात-पात, धर्म, व्रत्त-वैकल्य, नवस-सायास, भूत-पिशाच्च, जप-तप) अशा सर्व वाईट प्रथा व विचारांना बाजूला सारून संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांनी निर्माण केलेला अध्यात्मभाव व समता निर्माण करणारा वारकरी संप्रदाय आहे.

वारकरी संप्रदाय हा यादवाच्या काळात धर्म मार्तंडाच्या शोषणाखाली सामान्यजनाचे शोषण थांबविण्यासाठी अस्तित्वात आलेला आहे. मध्ययुगीन महाराष्ट्रातील धार्मिक व सामाजिक जीवन अध:पतीत होत चालले होते. वैदिक धर्माच्या नावाखाली कर्मठ ब्राह्मणांनी मानवतेचे शोषण करीत होते. सामान्य जनाच्या अज्ञानामुळे स्वार्थासाठी लुबाडले जात होते. अशा सर्वच बहुजन समाजांना वारकरी संप्रदायाने महाराष्ट्रातील मानवी जीवन मूल्याचे रक्षण करण्याचे कार्य केले. धार्मिक व सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवण्याचे कार्य या संप्रदायाने केले आहे.

वारकरी संप्रदाय हा सामान्य जणाच्या कल्याणासाठी वारकऱ्याचे आराध्य दैवत पंढरपूरचा 'श्री विठ्ठल पांडुरंग' आहे. वारकऱ्यांनी 'विठ्ठल' हा देव मानला. कारण विठ्ठल हा देव म्हणजे मानवसेवेतून निर्माण झालेले आहे. असा हा पंढरीचा पांडुरंग स्वीकारले गेले. विठ्ठलाचा श्रेष्ठ भक्त पुंडलिक होता. पांडुरंग हा भावार्थ भक्तीसाठी विटेवर उभा राहिले या भक्ती कथेनुसार वारकरी संप्रदायातील संतांनी विठ्ठल हा आपला देव माणून अध्यात्मिक कार्य तर केलेच त्यांनी धार्मिक व सामाजिक प्रबोधन करण्यासाठीही वारकरी संप्रदायाची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. पुढे जनसामान्य माणसाच्या प्रबोधनासाठी संत ज्ञानदेव आणि संत नामदेव यांनी मानव सेवेची धारणा समोर ठेऊन पंढरीच्या विठ्ठलाला स्वीकारले आहेत. एक दृढ मानवी कल्याणार्थ विठ्ठल दैवत मानले गेले. "विठ्ठू पालवीत आहे गेली आठ शतके लक्षावधी मनावर प्रेमाचे अधिराज्य गाजविणारा श्री विठ्ठल भक्त भाविकांना आपलाच वाटला आहे. संत ज्ञानदेवांनी त्याला विश्व सौंदर्यातून अनुभवले आहे. संत नामदेवांनी प्रेमस्वरूप मानले आहे. तर तुकोबांनी रंजल्या-गांजल्या जीवाचा सखा सोयरा म्हणून स्वीकारला आहे. साऱ्या भारतीय धर्मसृष्टीला कर्मठतेतून मुक्त करून तिला जीवन सन्मुख रसिकता प्रदान करणारा लोकसखा श्रीकृष्ण पंढरपुरात नांदतो, अशी सकल संतांची धारण आहे." हीच सामान्य जनतेची व वारकरी संप्रदायाची भूमिका असल्यामुळे वारकरी संप्रदायाचे महत्त्व आजही टिकून आहे.

वारकरी संप्रदायात संत ज्ञानेश्वर व संत नामदेवा यांची भूमिका व कार्य महत्त्वाचे आहे. वारकरी संप्रदायात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम प्रमुख संताबरोबर महाराष्ट्रातील इतर अनेक बहुजन समाजातील वारकरी संप्रदायात सामील होऊन अध्यात्माच्या कार्याबरोबर वारकरी संप्रदायाचे कार्य केले आहे. संत गोरा कुंभार, संत नरहरी सोनार, संत

चोखामेळा, संत कर्ममेळा यांनी आपली स्वतंत्र बाण्याची वारकरी संप्रदायाचे महात्म्य वर्णन करणारी अभंग रचना केली आहे. या सर्व संताबरोबर वारकरी संप्रदायात संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई, संत मुक्ताबाई या संताचे अभंगवाणीतील कार्य व भूमिका महत्त्वाची राहिली आहे. त्यांच्या अभंग वाणीतून विद्रोह तर आलाच आहे. त्याबरोबर व्यथा वेदना ही प्रकट झाली आहे. ज्या काळात वर्ण व्यवस्थेमुळे विषमता निर्माण झाली होती. स्त्रीला ही शूद्र समजलं गेलं होतं. जाती-धर्माच्या कडक निर्बंधात व कर्म कर्मकांडाच्या अतिरेकामुळे सामान्य जनता भरडली जात होती. वारकरी संप्रदायामुळे या सर्व “वैष्णवांचा धर्म । भेदाभेद अमंगळ” हा नारा देऊन वारकरी संप्रदायाने वर्णव्यवस्थाचे मनुवादी विचाराने स्त्री पुरुष हा भेद मानणाऱ्या संस्कृतीचा धिक्कार करून अध्यात्माची नवी वाट निर्माण करण्याचे कार्य वारकरी संप्रदायाने केले आहे.

संत जनाबाई यासारख्या संतांनी आपले जीवन पांडुरंगाच्या चरणी अर्पण करून वारकरी संप्रदायात आपले अस्तित्व अभंग वाणीतून वेगळी निर्माण करून ओळख करून दिले आहेत. वारकरी संप्रदायात संत जनाबाई हे ‘संतवाटीकेतील जाईची वेल’ म्हणून उल्लेख केला जातो. संत जनाबाई नामदेवाच्या घरी वाढलेली असल्यामुळे तिच्या मनात वारकरी संप्रदाय व विठ्ठल भक्ती होती. संत नामदेवाच्या सहवासाने व जनाबाईच्या वाणीला परब्रम्हाचे रुपत्व प्राप्त झाले होते. संत जनाबाईंनी स्वतःचा उल्लेख ‘नामयाची दासी’ म्हणून तिचे अभंग वाणीतून आलेले विचार हे विठ्ठल भक्ती बरोबर अमानवीय व्यवस्थेला आव्हान देण्याचे कार्य जनाबाईंनी केले आहे. संत जनाबाईचा जन्म गोदाकाठी गंगाखेड येथे दमा कुरुंड दांपत्याच्या पोटी झालेला असला तरी लहान वयात पोरके पण आल्यामुळे आल्यामुळे नामदेवच्या घरी वाढलेल्या आहेत. जनाबाई विठ्ठल भक्ती करून ते आपल्या जीवनातील दुःख दूर करण्याचे कार्य केले.

‘माय मेली पाप मेला । आता सांभाळी विठ्ठला’

असे ती आपल्या अभंगातून जीवनाची कहानी व्यतीत करून विठ्ठल भक्ती गायिली आहे. संत जनाबाईच्या अभंगात ठायी ठायी नामदेव आहेत. तिचे दासीपण ती बिरुद्वासारखे मिरवते. संत जनाबाईच्या जीवनात अनेक चमत्कारिक कथा दिसत असले तरी भक्ती भावाचे स्वरूप मात्र विठ्ठल भक्तीचेच आहे. जनाबाईच्या काव्यात विठ्ठल भक्ती विषयक जवळपास दीडशे अभंग उपलब्ध आहेत.

संत जनाबाईंनी तिच्या अभंगातून भक्तीशी नितळ प्रांजल मनाचे दर्शन मोठे भावपूर्ण आहे. संत जनाबाईच्या व्यक्तिमत्त्वाचा अविष्कार अत्यंत उद्‌बोधक आहे. जन्माने स्त्री शिवाय दासी कुळात जन्मल्याने तिच्या मनाची जी जखम आहे ती भक्ती भावाने व्यक्त केलेले दिसते. तिचा आत्मविश्वास तिच्या अभंगातून प्रकट झालेला पहावयास मिळतो.

‘नामयाची जनी, दासी ते म्हणती
भावे तो श्रीपती, वश केला
मी देव घेते अन देव देते
देवासंगे व्यवहारिते ‘

अशा पद्धतीने संत जनाबाईंनी आत्मविश्वास पूर्ण उद्गार तिच्या अभंगवाणीतून प्रकट झाले आहेत. आत्मविश्वासाचे धीटपणाचे व निर्मळ भक्ती भावाचे दर्शन अभंगवाणीतून पहायला मिळते.

संत जनाबाईंनी "विठु माझा लेकुरवाळा संगे । गोपाळांचा मेळा " या अभंगातून जनाबाईचे वात्सल्य प्रेमभाव प्रकट होते. विठ्ठलाला लेकुरवाळा रूपात पाहणे हे तिच्या प्रेमळ अनुभूतीचे दृश्य रूप होय. संत जनाबाईंनी विठ्ठलाला माऊलीच्या रूपात पाहिले.सर्वच संत हे विठ्ठलाची लेकरं आहेत हे वरील अभंगातून चित्रीत झाले आहे.

'देहाचा पालट विठोबाचे भेटी । जळ लवणागाठी पडोन ठेवली
नामयाचे जनी आनंद पै झाला । भेटावया आला पांडुरंग '

इतकी अतूट भक्ती विठ्ठलाची संत जनाबाईंनी केलेली पहावयास मिळते. पांडुरंग हा हाच माझा सर्व काही आहे.

संत जनाबाई कधी कधी आगतिक होऊन विठ्ठलाला शिव्या घालण्यास ती कमी करत नाही. कारण जनाबाई ही बंडखोर प्रवृत्तीची लक्षात येते.

अरे अरे विठ्या मूळ मायेच्या कारट्या
तुझे गेले मढे तुला पाहुन काळ रडे

या अभंगातील संत जनाबाई ने विठ्ठलाला शिव्या घालताना पहायला मिळते. परंतु दु:ख दुर करायला कुणीही येऊ शकत नाही. अशा प्रसंगातील, वात्सल्यापोटी परमेश्वराचे नाते जोडून 'तुझे गेले मढे' असे सहज उद्गारते व आपल्या मनातील भाव प्रगट करते. ही विठ्ठल भक्ती एवढी अगाध स्वरुपाची आहे हे दिसून येते.

संत जनाबाईने वारकरी संप्रदायात आल्यानंतर स्त्रीमुक्तीचा गजर केलेला दिसतो. जनाबाईच्या या अभंगात

डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारी जाईन मी
हाती घेईन टाळ खांद्यावर वीणा ।आता मज मना कोण करी
पंढरीच्या पेठे मांडियेले पाल । मनगटावर तेल घाला तुम्ही
जनी म्हणे देवा। रिघाले केशवा तुज घरी

या अभंगातील आशय हा संत जनाबाईने केलेला स्त्रीमुक्ती संदेश होय. ज्या काळात पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला चूल आणि मूल यापलिकडे तीचे जीवन नव्हते. ती बंदीस्त होती. अशावेळी हा जनाबाईने अभंगातील उद्घोष करुन स्त्री समता व स्वातंत्र्याचा पुरस्कार, वारकरी संप्रदायाने दिलेली स्त्री जन्माची सामाजिक कार्याची देण होय.

आंधळ्याची काठी। अडकली कवणे बेटी
माझिये हरिणी। गुंतलीस कोणे रानी
मुके मी पाडस। चुकले भावे पाहें वास
तुजवीन काय करु। प्राण किती कंठी धरुं

संत जनाबाईचे हे अभंग आशायाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. प्रारंभीच येणा–या आंधळ्याची काठीची प्रतिमा या दृष्टिने वेधक आहे. आंधळा ज्या काठीच्या आधाराने वाटचाल करतो. ती काठीच अडकून राहिली तर त्याचे जगणे किती अडचणीचे ठरु शकते. त्याच पध्दतीने मनुष्य आपल्या भविष्याच्या संबंधाने अंधारात असलेल्या माणसाची स्थिती आंधळ्यापेक्षा फारशी वेगळी असू शकत नाही. अशा वेळी विठ्ठला शिवाय मानवाला कोणीही साह्य करु शकत नाही. माझ्या जीवनात आलेल्या पोरक्या, अनाथ व एकाकी जीवनातून बाहेर पडण्यासाठी धडपडत व आर्तता विठ्ठलाच्या भक्तीने तो मार्ग सापडू शकतो. अशा आशय संपन्न दृष्टिने हा अभंग महत्त्वाचा मानला जातो.

**संदर्भग्रंथ :**

1) मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास-प्राचीन काळ- प्र.न.जोशी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
2) पाच भक्ती संप्रदाय - र.रा.गोसावी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
3) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास-ल.रा.नसिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर
4) मध्ययूगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- प्रा.नरेंद्र मारवाडे व प्रा. सुशील सोलापूरे, कैलाश पब्लिकेशनन्स, औरंगाबाद
5) वारकरी संप्रदाय : उदय व विकास-भालेराव प्र.ज्ञा, व्हीनस प्रकाशन, पुणे
6) संत कवयित्रीचे वाङ्मयीन कार्य - सुहासिनी इर्लेकर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे